प्रकरण १ ले

# अभ्यास विषयाची ओळख.

## प्रकरण १ ले.

## -:: विषयाची ओळख. ::-

१.१ प्रौढ शिक्षणाची गरज व महत्व.

१.२ प्रौढ शिक्षणाचा अर्थ.

१.३ प्रौढ शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी.

१.४ स्वातंत्र्यापूर्व काळ.

१.५ स्वातंत्र्यानंतर.

१.६ स्त्रियांच्यासाठी अनौपचारिक शिक्षण.

१.७ कामगारांचे शिक्षण.

१.८ नवे शैक्षणिक धोरण.

१.९ औसा तालुका प्रौढ शिक्षणाची पार्श्वभूमी.

## -: प्रकरण १ ले विषयाची ओळख :-

### १.१ - प्रौढ शिक्षणाची गरज व महत्त्व :-

निरक्षरता ही कोणत्याही समाजाला, देशाला लागलेली कीड आहे निरक्षरतेमुळे सामान्य आणि गरीब माणसांना सोपे व सामान्य नियम तसेच कायदे यांची माहिती नसते व त्यामुळे ते लुबाडले जातात. साक्षरतेमुळे विचारांची देवाण घेवाण सुलभ होते. नवीन गोष्टी शिकता येतात नवीन ज्ञान आत्मसात करता येते. साक्षरता व्यक्तिविकासाचे तसेच देशाच्या विकासाचेही प्रभावी साधन आहे. म्हणूनच निरक्षरतेचे उच्चाटन करणे आपणा सर्वांचे आद्य कर्तव्य आहे. प्रौढ शिक्षणामुळे स्वतःचा, कुटूंबाचा, समाजाचा, राष्ट्राचा विकास होतो. लोकशाही यशस्वी होण्यासाठी साक्षर जनता अधिक असली पाहिजे.

लोकांना ते कोणत्या परिस्थितीत राहतात हे समजावून देऊन, त्यांच्या समस्या सोडवून त्यांना स्वावलंबी आणि आत्मविश्वासू करावे हा प्रौढ शिक्षणाचा हेतू आहे. प्रौढ शिक्षण हे सामाजिक स्थित्यंतर होण्याचे, विकासाचे आणि प्रगतीचे साधन आहे. त्यामुळे कर्तव्यदक्षता, क्रियाशीलता व कार्यक्षमता वाढविणे, शक्ती युक्ती बुध्दी यांचा देशाच्या राष्ट्रीय विकासासाठी वापर होणे यासाठी प्रौढ साक्षर असणे महत्त्वाचे आहे. देशातील प्रौढांची शैक्षणिक पार्श्वभूमी लक्षात घेणे सद्य: परिस्थितीत आवश्यक आहे. त्यामुळे त्यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. प्रौढांचा सद्य: परिस्थितीत अनेक संघटनात सहभाग आहे का? ते पाहिले पाहिजे.

सध्या आपल्या देशातील ६०% जनता निरक्षर आहे. ही सगळीच निरक्षरता एकदम निपटून काढता येणे शक्य नाही. म्हणून सध्या ६ ते १४ वयोगटासाठी प्राथमिक शिक्षण आणि १५ ते ३५ वयोगटासाठी प्रौढ शिक्षण ह्या दोन कार्यक्रमावर भर देण्यांत येतो. तारूण्याची जिद्द आणि

भवितव्या विषयी आशावाद हया प्रवृत्ती १५ ते ३५ याच वयोगटात दिसायला हव्या, या गटातील सुमारे १२ कोटी भारतीय जनता निरक्षर आहे. हे सगळे गरीब आहेत. त्यात बहुसंख्य स्त्रिया आहेत.

महाराष्ट्रात पुरुषांची साक्षरता ५८.७९% तर स्त्रियांची साक्षरता ३४.७९ % आहे. १५ ते ३५ या वयोगटात १ कोटी १६ लाख ४९ हजार लोक निरक्षर आहेत. त्यात ६९ लाख ५६ हजार स्त्रिया आहेत. १९८१- ते ८५ या ५ वर्षात १६ लाख ८६ हजार प्रौढांना साक्षर केले त्यात ८ लाख ९३ हजार स्त्रिया व ७ लाख ९३ हजार पुरुष आहेत. तरी देखील अजून ९९ लाख ६१ हजार प्रौढ निरक्षर आहेत व त्यापैकी ६० लाख ७२ हजार स्त्रिया आहेत. [२]

महाराष्ट्रात अनुसूचीत जातीची एकूण लोकसंख्या ४४ लाख हजार ७९ इतकी आहे. त्यापैकी १५ लाख ६८ हजार १५ ते ३५ या वयोगटातील असून १० लाख ४८ हजार निरक्षर त्यात आहेत. त्यापैकी ३ लाख ८२ हजार प्रौढ साक्षर झाले. उरलेल्या ६ लाख ६६ हजार पैकी ३ लाख ९६ हजार स्त्रिया आहेत. महाराष्ट्र अनुसुचित जातींची एकूण लोकसंख्या ५७ लाख ७४ हजार आहे. त्यापैकी १५ ते ३५ वयोगटातील प्रौढांची संख्या २० लाख २१ हजार असून त्यात १६ लाख २६ हजार निरक्षर आहेत. त्यापैकी ३ लाख ६३ हजार प्रौढ साक्षर झाले परंतु अद्यापही १२ लाख ६३ हजार प्रौढ निरक्षर आहेत. त्यापैकी ७ लाख २२ हजार स्त्रिया आहेत.

कोणत्याही प्रकारची नवी माहिती मिळवायची झाली तर निरक्षर माणसांना इतरावर अवलंबून रहावे लागते. त्यांना लिहिता वाचता येत नाही. हिशोब ठेवता येत नाही. त्यामुळे लबाड लोक त्यांना फसवतात. निरक्षर माणसे स्वत:च बिनहिशोबी खर्च करतात. ते बेकायदा सावकारा कडून कर्ज काढतात आणि व्याजात बुडतात. निरक्षर मजूराना मजूरी कमी दिली जाते. त्यांना कायदे, सरकारी नियम, स्वत:चे हक्क या विषयी कांहीच माहित नसते. आणि त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होत रहातो. साक्षरता हे

स्वतंत्रपणे माहिती मिळविण्याचे परस्पर संपर्काचे साधन आहे. नातेवाईकांना मित्रमंडळींना पत्र लिहिणे, आपला हिशेब निट ठेवणे एवढे किमान व्यक्ती स्वातंत्र्य तरी साक्षरतेमुळे गरीब लोकांना मिळेल. स्त्रियांचे मनोधैर्य थोडे तरी वाढेल. त्यांच्या कार्यशक्तीला बळ लाभेल. आपल्यावर कोणत्या बाबतीत अन्याय होतो, तो का होतो? त्याचे निवारण कसे करता येईल हे समजून घेऊन अन्याय निवारणाची कृती करण्याचे धैर्य प्रौढ शिक्षणामुळे मिळेल.[3]

निव्वळ साक्षरता स्वतंत्र होण्यास पुरेशी नाही. प्रत्येक व्यक्तीला व्यवहार कळला पाहिजे. अलिकडे शेतीत, उद्योगधंद्यात, रोजच्या व्यवहारात यंत्राचा वापर खूपच व्हायला लागला आहे. मोजमापाची सवय, व्यवस्थितपणे काम करण्याची पध्दती, यंत्राची रचना समजून त्यांची दुरुस्ती करणे, यंत्राचा वापर किफायतशीरपणे करणे अशी कौशाल्ये शिकविली पाहिजेत. त्याचप्रमाणे बँकेचे व्यवहार, खरेदी विक्रीचे नियम, सहकार, आरोग्य सेवेच्या योजना, विविध विकास योजना, अशा गोष्टींची माहिती प्रत्येक प्रौढाला आवश्यक आहे. त्यासाठी प्रौढ शिक्षणाची गरज आहे.[४]

औपचारिक शिक्षण पध्दती ही खर्चीक व महागडी आहे. या शिक्षण पध्दतीला कांही मर्यादा आहेत. भारतातील निरक्षरता औपचारिक शिक्षण पध्दतीने कदापी हटणार नाही. त्यामुळे अनौपचारिक शिक्षणाचा वाढता प्रसार व वापर करावा लागेल असे जगभरचे शिक्षणतज्ञ आवर्जून सांगत आहेत. जगातील निरक्षराच्या ५० % निरक्षर एकटया भारतात आहेत. जीवन विकासासाठी शिक्षणाची गरज आहे. निरक्षरता व गरिबी या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. व्यक्तीला अक्षरज्ञान झाले की ती व्यक्ती हळू हळू वाचायला व लिहायला प्रवृत्त होते. अशिक्षीतपणाकडून -निरक्षतेकडून साक्षरतेकडे, सुशिक्षितपणाकडे- शहाणपणाकडे व्यक्तीचा प्रवास सुरु होतो. त्यांच्यात जाणीव, जागृती येते. व्यक्तीचा विकास होतो. व्यक्ती विकासातून

राष्ट्रविकास होतो. सुशिक्षीत व साक्षर जनता ही देशाला भूषणावह अशी गोष्ट आहे. ज्या देशात साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे तो देश सुखी व समृद्ध आहे. राजकिय आर्थिक दृष्टया मुक्त आहे. ही गोष्ट प्रगत देशातील साक्षरतेच्या प्रमाणावरुन लक्षात येईल.[५]

१.२ प्रौढ शिक्षणाचा अर्थ :-

प्रौढ शिक्षण म्हणजे काय याचे विश्लेषण करताना प्रथमत: यातील प्रमुख संज्ञा- प्रौढ शिक्षण-याचा अर्थ समजावून घेणे आवश्यक आहे.

प्रौढ म्हणजे १५ ते ३५ वयोगटातील स्त्री पुरुष होय. इंग्रजी मध्यें प्रौढाला ADULT असे म्हणतात. याचा अर्थ.

" ज्या व्यक्तीचा पूर्ण विकास झालेला आहे. आणि त्यांच्या मध्यें परिपक्वता आलेली आहे अशी व्यक्ती.

" Fully developed and mature. "

– वेब्सटर शब्द कोश.[६]

इंग्रजी मध्यें शिक्षणाला EDUCATION असे म्हणतात. याचा अर्थ -

शिक्षण म्हणजे तरुणांच्या विकासाची प्रक्रीया होय. याप्रक्रिये मध्यें सामाजिक स्थिती, गतीचा विकास या जाणीवेच्या अंगाने मानवाने आत्मसात केलेल्या सवयी, त्याची पध्दत याचा समावेश असतो.

"The Process of 'Bringing Up' young person. The Manner in which a person has been brought Up with reference to social station: kind of manners and habits acquired"

-ऑक्सफर्ड शब्दकोश.[७]

प्रौढ शिक्षण म्हणजे परिपक्वता आलेली आहे अशा तरुणांच्या म्हणजे १५ ते ३५ वयोगटातील स्त्री पुरुषांच्या विकासाची प्रक्रीया होय.

प्रौढ शिक्षणाचा अर्थ वेगवेगळ्या देशात आणि परिस्थितीत वेगवेगळा होतो. भारताच्या संदर्भात राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम याचा अर्थ प्रामुख्याने निरक्षर प्रौढांना साक्षर करणे हा होय. साक्षरतेच्या संदर्भात जाणीव जागृती, कार्यत्मकता, यांची ही अपेक्षा साक्षरतेच्या बरोबर येते. ८

प्रौढांना शिक्षण देवून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, या शिक्षणाच्या आधारावर केवळ संपत्ती मिळविणे नाही तर संपर्क साधणे मनामनाची जुळवण करणे, हा आहे. म्हणून प्रौढ शिक्षण याचा अर्थ एका हृदया कडून दुस-या हृदयाकडे सरळ रेषेत जाणारा प्रकाश होय. प्रौढाचा विश्वास ढळलेला आहे. तो पुन: निर्माण करणे, ज्ञानाचा आस्वाद कसा घ्यावा, लक्षपूर्वक पहावे कसे, वाचावे कसे इत्यादी बाबींची जाणीव करुन देणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय. जीवनातील अत्यंत उपयुक्त माहिती नीरक्षीरन्यायाने धावी, विवेक कसा जागृत होईल याची जाणीव देणे, ज्या प्रमाणे सूर्यतेज वितरणामध्यें समानता आहे, दाहकता नाही त्याच प्रमाणे जीवनातील बाबींच्या वितरणामध्यें समानता यावी त्यात दाहकता नसावी याची जाणीव देणे म्हणजे प्रौढ शिक्षण होय.

## १.३ -: प्रौढ शिक्षणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

प्रौढ शिक्षणाची सुरवात केंव्हा पासून झाली याची ऐतिहासीक पार्श्वभूमी पाहिली तर असे आढळून येते की, प्राचीन भारतीय इतिहासात उत्तम नागरिक तयार करणे, सामाजीक कर्तव्य, हक्क यांची जाणीव निर्माण करणे, जबाबदा-या ओळखणे, त्या पूर्णपणे पार पाडणे, यासाठी समाजातील स्त्री पुरुषांना शिक्षण दिले जात होते. कथा आणि पाठांतराद्वारे वरील जाणीवेचे शिक्षण दिले जात असे.

अशा वेळी ती व्यक्ती साक्षर असलीच पाहिजे असे नव्हते. या प्रकारे प्रौढ शिक्षणाची प्रक्रीया भारता मध्यें प्राचीन काळा पासून चालत आली आहे. स्वातंत्र्यपूर्व तसेंच स्वातंत्र्यानंतर प्रौढ शिक्षण ही प्रक्रीया अस्तित्वात आहे. या बाबतीत ऐतिहासिक पार्श्वभूमीचा अभ्यास करणे जरुर आहे.

१.४ -:स्वातंत्र्यपूर्व काळ. :-

भारत स्वतंत्र होण्यापूर्वी प्रौढ शिक्षण चळवळीत अनेक चढ उतार झाले.

१९३७ मध्यें प्रौढ शिक्षण हे नवीन जीवन जगण्यासाठीच नव्हे तर नवीन दृष्टीकोन( New Orientation ) निर्माण करण्यासाठी दिले गेले. या वेळी राष्ट्रीय कॉंग्रेसचे राज्यात बहुमत होते. शासक ब्रिटीश होते. अशा वेळी प्रौढ शिक्षण ही सरकारची जबाबदारी आहे हे मानले गेले. प्रौढ शिक्षण हे केवळ साक्षरतेसाठी नव्हते तर नागरिकत्वाची जाणीव करुन देण्यासाठी होते.

इ.स. १९३९ मध्यें भारतीय प्रौढ शिक्षण संघाची स्थापना झाली. ( Indian Adult Education Association) जनतेची मते आणि हेतू बदलण्यासाठी या संघटनेने प्रयत्न केले व त्यांचे जीवनमान सुधारण्याचे प्रयत्न केले. तसेंच या संघटनेने दि. इंडियन जर्नल ऑफ ॲडल्ट इज्यूकेशन:- The Indian Journal of Adult Education- हे नियतकालीक इ.स. १९४० मध्यें सुरु केले.[९]

१९४२ डिसेंबर मध्यें मुंबई येथील दादर भगिनी समजाने घरकामगाराचे तीन प्रौढ शिक्षण वर्ग चालविले. या वर्गाचे संचालन, श्री लक्ष्मण चितळकर, श्री. धोंडू पाडयाळ श्री, प्रभाकर जोशी यांनी केले. या व्यक्ती स्वत: " घरकामगार" असून वर्गाचे शिक्षक होते. हे वर्ग रात्री १0 नंतर म्हणजे

घरकाम संपल्यावर- प्रौढ विद्यार्थी कामातून मोकळे झाल्यावर सुरू होत असत पुरुषांचे वर्ग बहुदा सायंकाळी ५ ते रात्री १० पर्यंत असायचे तर स्त्रीयांचे वर्ग दुपारी १२-३० ते ३ वाजे पर्यंत या वेळा मध्यें चालत होते. या वर्गातील पटसंख्या २५ असली तरी सर्व साधारण ५ ते १० पर्यंतच हजेरी मिळायची. १० ते १५ प्रौढ हजर असणारे वर्ग क्वचितच पहायला मिळायचे अशा वर्गातील प्रौढ १० ते ३० या वयोगटातील घरकामगार या व्यवसायाचे होते.[१०]

या वर्गाचा अभ्यासक्रम प्रामुख्याने साक्षरता शिक्षणा पुरताच मर्यादीत होता. इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, सामान्यज्ञान, आरोग्य, विज्ञान, आकडे मोड हे विषय शिकविले जावेत अशी अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात शिक्षक शिक्षीका वर्गभेटीच्यावेळी साक्षरता प्रवेशिका यातील धड्यांचे वाचन घेत किंवा लेखन, शुध्द लेखन करून घेत. वरिल विषयांचे ज्ञान देत नसत. या शिवाय चार प्रौढ वर्गाला हजर राहिले ही गोष्ट त्यांना मोठी वाटायची तर कांहीजण "वर्ग आत्ताच संपला." चाळीत आज कोणाचा तरी मृत्यू झाला" अशा कारणाने कमी वेळेत वर्ग होत, वर्गाला सुट्टी देत आणि वर्ग भेटीला आलेल्या अधिका-यांच्या तावडीतून स्वत:ची सुटका करवून घेत.

वर्गातील अध्यापन, वाचन, लेखन, आकडेमोड किंवा अंकलेखन या पुरतेच मर्यादीत होते. इतर विषयाचे अध्यापन क्वचितच ठिकाणी होत असे.

पर्यवेक्षकाला दरमहा १४ रु. आणि शिक्षकाला दरमहा ७ रु. मानधन मिळत असे. आपला वर्ग कसाबसा अस्तित्वात येण्यासाठी शिक्षक शिक्षीका प्रयत्न करीत होते तीच परिस्थिती पर्यवेक्षक आणि विभाग संघटक यांची होती, एकूण सारे वातावरण व स्थिती निसत्व अशी होती.

प्रौढांची उपस्थिती वाढविण्यासाठी त्यावेळी सहलीचे कार्यक्रम आखले जात होते. १९४३-४४ मध्यें प्रौढांच्यासाठी सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आले. यात त्यांनी स्वत: तयार केलेले लोकसंगीत, लोकनृत्ये, लोकनाटके, पोवाडे, भजने, लेझीम इत्यादीचा समावेश होता. अशा प्रकारच्या कार्यक्रमातून

शिक्षक, पर्यवेक्षक, प्रौढ विद्यार्थी यांच्यात एक प्रकारचा जिव्हाळा निर्माण होवू लागला. वर्ग व्यवस्था व वर्ग संघटन या कामी परस्परांना सहकार्य करण्याची वृत्ती यांचा विकास झाला. ११

१.५ -: स्वातंत्र्यानंतर :-

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. आणि या देशाची स्वतंत्र अशी " प्रजासत्ताक शासन पध्दती" २६ जानेवारी १९५० पासून अस्तित्वात आली.

स्वातंत्र्यानंतर प्रौढ शिक्षण विषयीची मते विस्तृत झाली यात प्रत्येक प्रौढाला स्वत:च्या जबाबदा-या, हक्क आणि कर्तव्य, समजली पाहिजेत, या दृष्टीने प्रयत्न झाले. प्रौढ शिक्षणाचा हेतू फक्त उच्च वर्गीय व्यक्तीलाच नव्हे तर तळागाळातील सर्व स्थरातील व्यक्ती, मागास,भटक्या व विमुक्त जाती जमाती, आणि स्त्रिया यांना समाविष्ट करुन घेण्याचा होता. स्वराज्य प्राप्ती नंतर भारत सरकारने निरक्षरता निर्मूलनाच्या कामास अग्रस्थान दिले, स्वतंत्र भारताच्या केंद्रीय मंत्री मंडळाच्या लक्षात आले की लोकशाही पध्दतीने राष्ट्राचा विकास करण्यासाठी प्रौढ शिक्षणातून केवळ साक्षरतेचे शिक्षण नसावे तर साक्षरते बरोबरच सामान्य शिक्षण यावर भर देणे आवश्यक आहे. त्या वेळचे शिक्षण मंत्री मौलाना अब्दुलकलाम आझाद यांनी प्रौढ शिक्षणाचे नाव बदलून " समाज शिक्षण( Social Education ) हे नांव दिले, पहिल्या पंच वार्षिक योजनेत समाज शिक्षण हा महत्वाकांक्षी कार्यक्रम देण्यांत आला.

१९४८ मध्यें श्री. मोहनलाल सक्सेना यांच्या अध्यक्षतेखाली एक उपसमिती नेमली. त्या समितीने सामान्य शिक्षण यावर भर देण्यास सांगितले.समाज शिक्षणातून :-

१) साक्षरता.

२) सर्वसाधारण शिक्षण.

३) मनोरंजन.

४) फुरसतिच्या वेळेच्या सदुपयोग.

५) नागरिकांचे हक्क कर्तव्य व कौटुंबिक आरोग्यदायी जीवन आणि व्यवसाय शिक्षण -

अशा पाच गोष्टीवर भर दिला. आणि राष्ट्राच्या विकासासाठी जनता साक्षर असणे आवश्यक आहे. यासाठी समाज शिक्षणाची अत्यंत गरज वाटली आणि समाज शिक्षण प्रक्रियेस सुरुवात झाली.[१२]

१) <u>समाज शिक्षणाची उद्दिष्टे.</u>-

१) सामान्य व्यक्तीला त्यांचे हक्क आणि कर्तव्ये यांची जाणीव करुन देणे.

२) नागरिकांचे महत्व जाणीव करुन देणे.

३) उत्पादन क्षमता वाढवून त्यांना उच्च प्रतिचे जीवन जगता आले पाहिजे,

अशी उद्दिष्टये दृष्टी समोर ठेवून कार्यास सुरुवात झाली.

ग्राम शिक्षण मोहिम :-

१९५९ मध्यें ग्राम शिक्षण मोहिमेला महाराष्ट्रात सुरुवात झाली. या मोहिमेतूनच( Mass Approach ) जनसमुदायाशी हितगुज, जवळीक, निर्माण झाली याचा पहिला प्रयोग सातारा जिल्हयात करण्यांत आला. १४ ते ३५ वयोगटातील व्यक्तींना साक्षर करावयाचे हा हेतू होता. ग्रामीण भागातील निरक्षरांना साक्षर करणे, ग्रंथालय सेवा उपलब्ध करुन देणे शैक्षणिक साहित्य पुरवठा करणे, समाज शिक्षणाचे धडे ग्रामीण जनतेला देणे.थोडक्यात-"घरोघरी ज्ञानाचा दिवा लावा" यातून सर्वांगीण प्रगती साध्य करुन घ्यावयाची या साठी ग्राम ,तालुका, जिल्हा,

अशा स्तरावर समित्या नेमल्या गेल्या. संपूर्ण गांव साक्षर झाल्यानंतर " ग्राम गौरव" असे कार्यक्रम आयोजित करण्यांत येवू लागले. अभ्यासकाने अभ्यासासाठी निवडलेल्या कार्यक्षेत्रात १९६२ ते १९६८या कालावधी मध्यें पूर्ण तालुक्यातील सर्व गांवाचा " ग्राम गौरव" झाल्याचे आढळले.[13]

शेतकरी प्रशिक्षण- कार्यात्मक साक्षरता :- या योजनेचाही अंतर्भाव महाराष्ट्र राज्यात होता. प्रौढ शिक्षणाची संज्ञा वरचेवर बदलत चालली आणि साक्षरतेचा संबंध व्यक्तीचे उत्पन्न आणि राष्ट्राचा विकास असा जोडण्यांत आला.

आपला देश कृषी प्रधान आहे. देशाची आर्थिक स्थिती प्रामुख्याने कृषी व्यवसायावर अवलंबून आहे. शेकडा ८० % जनता ग्रामीण भागात आहे. आणि त्यांचा प्रमुख व्यवसाय हा कृषी आहे. तेंव्हा कार्यात्मक साक्षरता शेतक-यांना देण्यांचा कार्यक्रम १९६८ पासून अंमलात आला. हा कार्यक्रम म्हणजे- प्रौढ शिक्षणाच्या इतिहासातील एक दीपस्तंभ होय .[14] केंद्रीय शासनातील तीन केंद्रीय मंत्री १) शेतकी- कृषी मंत्री २) माहिती व प्रसिध्दी मंत्री ३) शिक्षण मंत्री या मंत्रीत्रयींनी १९६८ मध्यें शेतक-यांना प्रशिक्षण देणे व साक्षर करणे ही योजना अंमलात आणली.

या कार्यक्रमाची उद्दिष्टये.:-

१) शेतक-यांना केंद्रीय कृषी खात्यातर्फे प्रशिक्षण देणे.

२) केंद्रीय शिक्षण खात्यातर्फे कार्यात्मक साक्षरता राबविणे.

३) केंद्रीय माहिती व प्रसिध्दी खात्यातर्फे शेती संबंधीचे ज्ञान शेतक-यांना देणे.

४) अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्णता येण्यासाठी पिकाचे उत्पादन वाढविणे.

५) शेतीची उत्पादन शक्ती वाढविणे.

ही राष्ट्रीय उद्दिष्टये. स्वीकारण्यात आली.

१९६९-७० मध्यें या कार्यक्रमाद्वारे ३६००० शेतक-यांना या योजनेत समाविष्ट करून घेण्यात आले. या कार्यक्रमाचे मूल्यांकन एका समितीद्वारे करण्यात आले. या समितीने काढलेले निष्कर्ष खालील प्रमाणे आहेत.

१) सधन शेतक-यांनी पीक प्रात्यक्षीक यात भाग घेतला तर गरिब शेतकरी वर्ग साक्षरता कार्यक्रमात सहभागी झाला.

२) कृषी उत्पादनातील समस्या " या विषयावरील चर्चा. " साक्षरता वर्ग " आणि " चर्चा मंडळ"याचा परस्पराशी संबंध अभावाने आर्दली चर्चा परिणाम कारक झाली नाही.

३) स्वयंसेवी संस्था आणि अशासकीय प्रतिनिधी यांचा सहभाग असावा असा कोणताही प्रयत्न झालेला नाही.

४) शैक्षणिक साहित्य आणि साधने अपुरी होती.

५) नियोजन आणि अंमलबजावणी यामध्यें समन्वय आणि एकत्रीकरण साधता आले नाही.

६) या कार्यक्रमाचा पाठपुरावा अभावाने झाला.

७) या देशाचा विचार करता पायाभूत उद्दिष्टे यात अनेक त्रुटी आढळून आल्या.

८) या योजनेत सहभागी झालेला कर्मचारी वर्ग संख्येने अल्प, आणि अनुभवी नव्हता.[१५]

१.६. -:स्त्रियांच्यासाठी अनौपचारिक शिक्षण.-

प्राचीन काळात ऋग्वेद कालखंडा मध्येंच स्त्रियांना पुरूषा बरोबर शिक्षण घेण्याचा अधिकार होता. आजन्मब्रम्हचारी राहून अथवा विवाह होई पर्यंत व झाल्यानंतरही स्त्रियांना शिक्षण घेण्याचा अधिकार होता. पुढील काळात वर्ण व्यवस्था रूढ झाली. आणि स्त्रियांना शिक्षणा पासून वंचित रहावे लागले. २० व्या शतकाच्या ७ व्या दशका पर्यंत स्त्री ही शिक्षणा पासून वंचित राहिली आणि पर्यायाने स्त्री निरक्षर प्रौढांचे प्रमाण

वाढले.

१९ व्या शतकात महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे इत्यादी समाज सुधारकांनी स्त्री शिक्षणाची मोहिम हाती घेतली यातूनच श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, अखील भारतीय स्तरावर सुरु करण्यात आले. निरक्षर प्रौढ स्त्रियांना साक्षर करण्याचे प्रयत्नही मोठया प्रमाणावर सुरु झाले . या मधील मुख्य गाभा म्हणजे-

-" एका पुरुषाला साक्षर केले तर तो एकटाच साक्षर होतो परंतु एका स्त्रिला साक्षर केले तर संपूर्ण कुटूंब साक्षर होते. " [१६]

"If you Educate a man, you Educate an Individual If you Educate a women you Educate a family".

- या नुसार स्त्रियांना साक्षर करण्याचा प्रयत्न प्रौढ शिक्षणात प्रथम क्रमांकावर आहे. स्त्री आपल्या मुलांना शाळेत वेळेवर पाठविल, मुलांच्या, कुटूंब कर्त्याच्या आरोग्याची काळजी घेईल, कौटुंबिक खर्चाचे अंदाजपत्रक, काटकसर इत्यादी बाबतीत ज्ञानी होईल. तशी ती असतेच.तरीही आवश्यक शिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यांच्यात जाणीव जागृती करणे जरुर आहे. म्हणून निरक्षर प्रौढ स्त्रीयांच्या शिक्षणावर भर देण्यात आला.

## १.७ -: कामगारांचे शिक्षण :-

औद्योगिक क्रांती नंतर नवनवीन उद्योगधंदे उदयास आले. यामुळे शहरीकरण वाढले. त्याच बरोबर कुशल अकुशल कामगार वर्ग निर्माण झाला. यातून बहुसंख्य वर्ग हा निरक्षर राहिला, या वर्गाला साक्षर करणे जरुरीचे होते. तेंव्हा त्यांना शिक्षण देण्यासाठी " सेंट्रल बोर्ड ऑफ वर्करस् एज्युकेशन" या संस्थेची १९५८ मध्ये स्थापना झाली. शेती व औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन वाढविण्यासाठी प्रौढ शिक्षण चळवळीला व्यापक रुप दिले, समाज शिक्षकांच्या कार्यकर्त्यांना प्रशिक्षणाची सोय केली. ग्रंथालयांचा विकास करण्यांत आला.

युनेस्कोच्या मदतीने श्रमिक विद्यापीठाची स्थापन करण्यांत आली व राष्ट्रीय प्रौढ शिक्षण मंडळ स्थापन केले. इ.स. १९६० इंदोर, १९६७ मुंबई आणि १९६९ नागपूर येथे श्रमीक विद्यापीठाचे कार्य सुरु झाले.[१७]

शिक्षण मंत्रालयाने युवक सेवा संघटना, अन्न व शेती मंत्रालय, माहिती व ध्वनी क्षेपण खाते, यांच्या संयुक्त सहकार्याने शेतक-यांच्या शिक्षणासाठी अनेक योजना तयार केल्या. ६ महिने मुदतीच्या शेतक-यांच्या साठी एक अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. या योजनेत स्वयंसेवी संघटनानी मदत केली. कामगार समाज शिक्षण संस्था स्थापन केल्या. १९७० मध्यें प्रौढ शिक्षण राष्ट्रीय बोर्ड स्थापन केले. तसेंच प्रौढ शिक्षण संचालन मंडळाचीही स्थापना करण्यांत आली.

जनता केंद्र :- सुरुवातीला महिलासाठी शिवण काम, छोटे छोटे गृह उद्योग सुरु करण्यात आले. युवकासाठी क्रीडा केंद्र सुरु करण्यात आले. या जनता केंद्राला " गांधी स्मारक निधी" यातुन अनुदान मिळत होते. असे अनुदान सात वर्षे मिळाले पुढे अनुदान बंद करण्यात आले. परंतु जनता केंद्र मात्र चालुच राहिले.[१८]

प्रौढ शिक्षण कार्यक्रम पंचवार्षिक योजना :-

स्वराज्य प्राप्ती नंतर भारत सरकारने निरक्षरतेचे निर्मुलन करण्यासाठी या कार्यक्रमांस अग्रस्थान दिले.

१ ली पंचवार्षिक योजना :- १९५१ ते १९५६.

अ) ५० लाख रुपयाची तरतुद समाज शिक्षण खर्चासाठी केली होती.

ब) कार्यक्रमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात विभागुन दिली होती.

क) सामुदायिक केंद्रे, ग्रंथालये, जनता कॉलेज सुरु करण्याचे नियोजन होते. विविध भाषातुन पुस्तके प्रसिध्द करण्यासाठी नॅशनल बुक ट्रस्ट स्थापन झाले.

२ री पंचवार्षिक योजना १९५७ ते १९६१.
---------------------------------

अ) समाज शिक्षणासाठी ५ कोटी रुपयाची तरतूद करण्यांत आली.

ब) राष्ट्रीय मूलभूत शिक्षण केंद्र स्थापन केली.
या केंद्रा मार्फत :-

क) संशोधन, आणि मूल्यमापन, समाज शिक्षण देणा-या व्यक्तींचे प्रशिक्षण, दर्जेदार शैक्षणिक साधने व साहित्य निर्मिती यावर भर दिला.

३ री पंचवार्षिक योजना १९६२ ते १९६६ .
---------------------------------

अ) समाज शिक्षणासाठी २५ कोटी रुपयाची तरतूद.

ब) ग्रंथालय विकास व विस्तार, विकास साहित्य निर्मिती यावर भर दिला. परंतु १९६२ च्या भारत-चीन युध्दामुळे या योजनेवर परिणाम झाला. समाज कार्याची गती मंदावली.

क) साक्षरतेला अधिक प्राधान्य दिले.

४ थी पंचवार्षिक योजना [redacted]
---------------------------------

अ) समाज शिक्षणासाठी ६ कोटी ४ लाख रुपयांची तरतूद करण्यांत आली.

ब) समाज शिक्षण चळवळीला व्यापक रूप दिले.

क) समाज शिक्षणाचे कार्यकर्ते यांच्या प्रशिक्षणाची सोय करण्यात आली.

ड) युनेस्कोच्या मदतीने श्रमिक विद्यापीठाची स्थापना केली.

५ वी पंचवार्षिक योजना :- [redacted]

अ) ३५ कोटी रुपयाची तरतूद करण्यांत आली.

ब) साक्षर प्रौढासाठी भिन्न भिन्न भाषेत पुस्तके प्रकाशित केली.

क) जिल्हा ग्रंथालयाची स्थापना, कार्यात्मक साक्षरता वर्ग, युवक संघटना स्थापन करणे, स्त्रियांच्यासाठी अभ्यासक्रम तयार करण्यावर भर दिला.

६ वी पंच वार्षिक योजना [redacted]

अ) १२८ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली.
६० कोटी रुपये केंद्रीय स्तरावर आणि ६८ कोटी रुपये राज्य सरकार तर्फे.

ब) प्रौढांच्या शिक्षणावर जास्त भर दिला.
१९७८ मध्यें जनता सरकारने प्रौढ शिक्षणाचा कार्यक्रम व्यापक प्रमाणावर राबविला १९८० मध्यें कॉंग्रेस पक्ष सत्तेवर आल्यानंतर त्यांनी १५ ते ३५ या वयोगटातील व्यक्तींना साक्षर करण्यास प्राधान्य दिले. [१९]

- १९९० पर्यंत १५ ते ३५ वयोगटातील १००% निरक्षर प्रौढांना साक्षर करण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला.
- २० कलमी कार्यक्रमात " विद्यार्थी सहभाग" यावर विशेष भर देण्यांत आला. विद्यापीठ आणि त्यांची संलग्न महाविद्यालयात चालू असलेल्या प्रौढ शिक्षण आणि निरंतर प्रौढ शिक्षण योजनांच्या आढावा घेणे त्यासाठी एक कार्यकारी गट स्थापन केली आहे.
- एन्.सी.सी, एन्.एस.एस्. राष्ट्रीय प्रौढ शिक्षण विभाग, नेहरु युवक केंद्र, जिल्हा विकास मंडळ, जिल्हा परिषद, पंचायत समिती, स्वयंसेवी संस्था अशा संघटनांना सहभागी करुन घेण्याची तरतूद आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने घेण्यात येणारी ग्रामीण पूनर्रचना शिबीर Y.F.R.R.youth For Rural Reconstruction"- अशी- शिबीरे ही १९८९-९० या वर्षापासून " साक्षरतेसाठी युवक" या नावाने ग्रामीण भागात दहा दिवसासाठी आयोजित केली जातात. [२०]

१.८ -: नवे शैक्षणिक धोरण -

इ.स. १९८६ मध्यें भारत सरकारने नवीन शैक्षणिक धोरण आखले. या मध्यें राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रमा मध्यें, कौशल्य, विकास आणि जाणीव जागृती या गोष्टी वर अधिक महत्त्व देण्यांत आले. प्रौढ साक्षर झाल्यानंतर त्यांची साक्षरता टिकविण्यासाठी अथवा पुढील शिक्षणासाठी योग्य असे वातावरण असले पाहिजे, ( निर्माण झाले पाहिजे. ) असे प्रयत्न अथवा वातावरण निर्माण झाले नाही तर त्याला लाभलेल्या साक्षरतेचा उपयोग होणार नाही. त्यासाठी भारत सरकारने १९८२-८३ मध्यें पुढील साक्षरता व निरंतन शिक्षण चालू ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याच योजने प्रमाणे हा कार्यक्रम तीन वर्षाचा राहिल. त्यामध्यें ३५0 घडयाळी तास प्रारंभीक साक्षरता, १५0 तास उत्तर साक्षरता, आणि 100 तास अनुवर्ती कार्यक्रमाची व्यवस्था होईल. त्या प्रमाणे १९८५ मध्यें कार्यक्रम राबविणा-या संस्थाना सूचना दिल्या गेल्या. त्यामध्यें ८ महिने प्रारंभीक साक्षरता, ४ महिने उत्तर साक्षरता व एक वर्षाचा अनुवर्ती कार्यक्रम ठेवण्याचे ठरले. त्या प्रमाणे इ.स. १९८६ मध्यें भारत सरकारने राष्ट्रीय साक्षरता मिशन सुरु करण्याचा निर्णय घेतला. याचे उद्देश दोन होते १) १५ ते ३५ या वयोगटातील लोकांना कार्यात्मक साक्षरता पूर्ण केल्यानंतर ती टिकविणे २) साक्षरतेवर जादा भर देणे .

" राष्ट्रीय साक्षरता मिशन " ही मोहिम कार्यरत करण्याचे पूर्वी पासूनचे प्रयत्न होते. पण निरक्षरतेचे पूर्ण निर्मूलन होवू शकले नाही. म्हणून नवीन अभियानाची आवश्यकता भासली. हे एक विशिष्ट कार्य

आहे. यासाठी प्रचारक पाठविण्याची आवश्यकता होती. म्हणून या ठिकाणी इंग्रजी शब्द " मिशन" हा वापरला आहे. मिशन या इंग्रजी शब्दाचा अर्थ विशिष्ट कार्य असा आहे.

या मोहिमेचे उद्घाटन ५ मे १९८८ रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी दिल्ली येथे केले. महाराष्ट्र राज्यात २ जून १९८८ रोजी मा. श्री. शंकरराव चव्हाण, तत्कालीन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, यांचे हस्ते झाले. व या योजनेचा प्रारंभ महाराष्ट्र राज्यात झाला. [२१.]

"राष्ट्रीय साक्षरता मिशन" या योजनेद्वारे देशातील १५ ते ३५ वयोगटातील तीन कोटी व्यक्तिना इ.स. १९९० पर्यंत आणि पाच कोटी व्यक्तिना इ.स. १९९५ पर्यंत कार्यात्मक दृष्टया साक्षर करण्याचे आयोजित केले आहे. हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. अंकज्ञान, साक्षरता या क्षेत्रातील वाढलेली पातळी या बरोबर जाणीव जागृती आणि कार्यात्मकता याचीही अपेक्षा गृहीत धरलेली आहे.

या सर्वाची सर्व साधारण कार्य पध्दती व या संबंधीचे मार्गदर्शन केलेले आहे यात:-

१) जन शिक्षण निलयम प्रौढ शिक्षण वर्गातील अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर प्रौढांची साक्षरता, त्यांच्यातील कौशाल्य टिकविण्यासाठी, त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी, जन शिक्षण निलयम ही योजना आहे. यात प्रौढासाठी वाचनालयाची सोय असून प्रचारक प्रौढांच्या घरी जावून पुस्तकांची देवाण घेवाण दर दोन/ तीन दिवसानी करीत असतो.

२) कार्यात्मक साक्षरतेची सामुहिक चळवळ एम्.पी.एफ्.एल्. M.P.F.L. यांत महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी आणि इतर विभागातील विद्यार्थी यांनी एका प्रौढास, त्यांच्या सोयीच्या वेळेनुसार त्यांच्या राहण्याच्या,

ठिकाणावर जावून शिकवावे.

३) तरुण विद्यार्थ्यांचा सहभाग: महाविद्यालयीन, कनिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थींनी यांनी अशा कार्यक्रमांत सहभागी व्हावे. म्हणून राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, विद्यार्थी कल्याण मंडळ, या संघटना कार्यरत आहेत. [२२]

१.९ -: औसा तालुका प्रौढ शिक्षणाची पार्श्वभूमी.

राष्ट्रीय प्रौढ शिक्षण कार्यक्रम या योजने द्वारे मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद अंतर्गत श्री. कुमार स्वामी महाविद्यालय, औसा या संस्थेने प्रौढ शिक्षणाचे १0 वर्ग, जून १९७९ पासून सुरु केले. १९८३-८४ या वर्षापासून श्री. महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर , दयानंतद वाणिज्य महाविद्यालय लातूर, यांच्या तर्फे औसा तालुक्यातील बुधोडा, हसेंगाव व गावी वर्ग सुरु करण्यांत आले इ.स. १९८९-९0 या शैक्षणिक वर्षात महाविद्यालया तर्फे चालविण्यांत येणारे हे प्रौढ शिक्षणाचे वर्ग बंद करण्यात आले.

औसा तालुक्यातील जवळगा पोमादेवी येथील शिक्षण संस्था, पोमादेवी शिक्षण प्रसारक मंडळ जवळगा (पो.) यांनी केंद्रीय शासनाच्या सहकार्याने प्रौढ शिक्षणाचे वर्ग १९८५-८६ मध्यें चालविले परंतु योग्य प्रतिसाद न मिळाल्या मुळे संस्थेने आपले कार्य थांबविले.

ग्रामीण कार्यात्मक साक्षरता वर्ग आणि राज्य प्रौढ शिक्षण योजना शासना तर्फे राबविली जाणारी ही योजना या तालुक्यात राबविण्यास सुरुवात झाली. १९८२ पूर्वी हा तालुका उस्मानाबाद जिल्हयात समाविष्ट होता. परंतु १६ ऑगस्ट १९८२ रोजी नव्याने निर्माण झालेला लातूर जिल्हा या मध्यें औसा तालुक्याचा समावेश झाला . या बदलामुळे --

प्रौढ शिक्षणाचे जिल्हा कार्यालय उस्मानाबाद येथेच पूर्वी होते. लातूर या जिल्ह्याची ठिकाणी कार्यालय आल्यानंतर प्रौढ शिक्षण विभागाने ही मोहिम धडक पध्दतीने राबविली. [२४]

ग्रामीण कार्यात्मक साक्षरता विभाग आणि राज्य प्रौढ शिक्षण योजना यांच्या तर्फे चालविले गेलेल्या केंद्राची संख्या खालील प्रकारे होती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९८५-८६ | स्त्री पुरुष यांची | - | २१० | केंद्रे. |
| २) | १९८६-८७ | स्त्री पुरुष यांची | - | १६० | केंद्रे. |
| ३) | १९८७-८८ | स्त्री पुरुष यांची | - | १५० | केंद्रे. |
| ४) | १९८८-८९ | स्त्री पुरुष यांची | - | १५० | केंद्रे. |
| ५) | १९८९-९० | स्त्री पुरुष यांची | - | ५०० | केंद्रे होती. |

अशा प्रकारे जिल्हा प्रौढ शिक्षण विभाग, जिल्हा लातूर याचे तर्फे ही योजना राबविण्यांत येत आहे. इस. १९८७-८८ मध्यें महाविधालया तर्फे चालविले जाणारे वर्ग या भागात बंद होते. १९८९-९० मध्यें महाविधालया तर्फे चालविले जाणारे वर्ग पुन: बंद करण्यांत आले.

या प्रकारे ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहिली तर सतत बदलणारी परिस्थिती, प्रशासनात झालेले बदल, कार्यालयीन बदल, विधापीठ स्तरावरिल बदल, यामुळे प्रौढ शिक्षण वर्गाला चढ उतार लाभलेला आहे. सरळ संथ गती लाभलेली दिसत नाही. या पार्श्वभूमीवर या तालुक्यातील प्रौढ शिक्षण केंद्राचा अभ्यास अभ्यासकाला आवश्यक वाटतो.

संदर्भ सूची :-


१) मानव संसाधन- विकास मंत्रालय, शिक्षण विभाग भारत सरकार- नई दिल्ली १९८८. राष्ट्रीय साक्षरता मिशन.

२) इंडियन इन्स्टीटयूट ऑफ एज्युकेशन, पुणे. अनौपचारिक शिक्षण साधन केंद्र पुणे. महाराष्ट्र १९८६ पहिली आवृत्ती. प्रौढ शिक्षण का आणि कसे ?
पृष्ठ क्रमांक: 8.

३) कित्ता.

४) कित्ता.

५) मानकर अवधुत आनंदराव - २२ ऑक्टो १९३९. प्रौढाचे शिक्षण व साक्षरता प्रसार. प्रकरण १ ले पृष्ठ क्रमांक १, २

६) Webester's New Collegiate Dictonary - 1975 Page No.17

७) The concise Oxford English Dictionary of current English 1964 - Edited by H.W.Fowler and F.G.Fowler.
based on The Oxford Dictonary Fifth Edition Revised by E.M.Mchintosh.

८) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना- काही उपयुक्त टिपणे - अनौपचारीक प्रौढ शिक्षण साधन केंद्र. भारतीय शिक्षण संस्था- पुणे ४११०२९.

९) Dutt S.C. 1987 Adult Education in Third World. Page No. 129, 130

१०) गावकर ग.का. प्रौढ शिक्षणातील एक अदम्य प्रवास. आत्मचरित्र पृष्ठ क्र. ४ ते ६

११) गावकर ग.का. प्रौढ शिक्षणातील एक अदम्य प्रवास.
आत्मचरित्र पृष्ठ क्रमांक ८.

१२) Dutta S.C. 1987 Adult Education in Third World
Page No.132,133

१३) कित्ता. १३४,१३५

१४) कित्ता. १३५

१५) कित्ता. १३५,१३६

१६) Indian Adult Education Association - June 1973
ADULT EDUCATION FOR WOMEN - Page No.10,58,59.

१७) Dutta S.C. 1987 Adult Education in Third World.
Page No.138, 139.

१८) गावकर ग.का. प्रौढ शिक्षणातील एक अदम्य प्रवास.
आत्मचरित्र पृष्ठ क्रमांक १३३,१३९,१४२

१९) राष्ट्रीय प्रौढ शिक्षण योजना- काही उपयुक्त टिपणे.
अनौपचारिक प्रौढ शिक्षण साधन केंद्र.
भारतीय शिक्षण संस्था, पुणे ४११०२९

२०) Government of India, Ministry of Human Resource Development.
Department of youth Affairs and sports.
Programme Adviser's CELL. N.S.S.New Delhi.
March, 20, 1989, D.O.No.5-12/88-N.S.S.P.A.C.

२१) Dutta S.C.1987 Adult Education in Third World
Page No.142,143.

२२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई- १९८८.
राष्ट्रीय साक्षरता मिशन.

२३) कार्यक्रमाधिकारी - राष्ट्रीय प्रौढ शिक्षण विभाग
श्री. कुमारस्वामी महाविद्यालय, औसा १९८८
हस्तपुस्तिका.

२४) District Adult Education Office Latur District.
1988-89
Profile and Action Plan.